# द बिशप्स स्कूल, कॅम्प - ज्युनिअर स्कूल

## मराठी दिवस २०२२-२३ वृत्तांत

---

**ही मायभूमी ही जन्मभूमी,**

**ही कर्मभूमी ही आमुची**

**महावंदनीय अतिप्राणप्रिय,**

**ही मायमराठी आमुची**

**मराठी ही आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि संस्काराचे बोल आहेत. या मायमराठीने आपल्यास व्यक्त होण्यासाठी शब्दांची पाखरण केली.**

श्रेष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणजे २७ फेब्रुवारी संपूर्ण जगभरात मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षी २७ जानेवारी २०२३ला ज्युनिअर स्कूलमध्ये मराठी दिवस मोठ्या उत्साहाने साजरा झाला.



**शर्विल कोष्टी (इयत्ता पाचवी अ ) आणि शिवांश वाळंज ( इयत्ता चौथी ई ) या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. द बिशप्स स्कूलच्या प्रथेनुसार कार्यक्रमाची सुरुवात ज्युनिअर स्कूलच्या पर्यवेक्षिका माननीय मिस बारसे मॅम यांच्या प्रार्थनेने झाली. यानंतर सूत्रसंचालकांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हणजेच कार्यक्रमाची पार्श्वभूमी सादर केली.**

**झालेत बहु, होतीलही बहु**

**पण यासम हा**

अशा अद्‌वितीय पु. ल. देशपांडे यांचे जीवनचरित्र इयत्ता चौथीच्या विद्‌यार्थ्यांनी प्रस्तुत केले. इयत्ता पाचवीच्या विद्‌यार्थ्यांनी विनोदी नाटिकेद्‌वारे प्रेक्षकांचे मनसोक्त मनोरंजन केले. इयत्ता पहिली, दुसरी आणि पाचवीच्या विद्‌यार्थ्यांनी अतिशय मनमोहक मिश्रित नृत्य सादर केले.



माननीय प्राचार्य श्री. जोएल एडवीन सर, माननीय मुख्याध्यापक श्री. गेनर सर आणि ज्युनिअर स्कूलच्या पर्यवेक्षिका माननीय मिस बारसे मॅम यांनी विद्‌यार्थ्यांना कलागुणांच्या अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहोत.

सौ. शितल सूर्यवंशी

ज्युनिअर स्कूल

सहायक शिक्षक



